सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६४ | शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

# विद्यार्थिनींच्या छेडखानीविरूद्धच्या 'एल्गार'ला एकमुखी पाठिंबा

## दै. ग्लोबल महातेजने ज्वलंत समस्येला वाचा फोडल्याबद्दल सर्वांनी केले कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या सतत होणाऱ्या छेडखानीच्या पार्श्वभूमीवर दै. ग्लोबल महातेजने व्यापक जनआंदोलन उभारण्यासाठी तथा भव्य मोर्चाचे नियोजन करण्यासाठी गुरुवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी आयएमए- लायन्स हॉल येथे बैठक बोलाविली होती. सदर बैठकीत विविध शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, संस्था व संघटनांचे अनेक प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी छेडखानी विरूद्धच्या एल्गारला एकमुखी पाठिंबा दिला.

सोमवार, दि. १ डिसेंबर रोजी सदर ज्वलंत समस्या व त्याकडे पोलीस व प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी दि. ६ डिसेंबर रोजीच्या नियोजीत मोर्चाबाबत पोलीस व प्रशासनाकडे निवेदन देण्यात येणार आहे. दि. ६ डिसेंबर रोजी मुलींच्या सर्व शाळा, सर्व महाविद्यालयांच्या विद्यार्थिनी, विविध शैक्षणिक, सामाजिक व राजकीय संस्था, संघटना व पक्ष आदींचे प्रतिनिधी मोर्चात सहभागी होणार आहेत.

ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले यांनी सदर जनआंदोलन आणि मोर्चाची आवश्यकता का आहे? याबाबत उपस्थितांना माहिती दिली. जनआंदोलन व नियोजीत मोर्चाबाबत सर्वांचा कौल घेतला. यापुढे अशा समस्यांना वाचा फोडण्यासाठी कायमस्वरूपी समिती गठीत करावी, असेही यावेळी ठरले.






*मुलींच्या छेडखानीबाबतचे धक्कादायक किस्से व या ज्वलंत समस्येचे कायमचे निराकरण करण्यासाठी जनआंदोलनाच्या आवश्यकतेचे अवाहन करताना ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले.* (छायाचित्र : मयूर चौधरी)

## उपस्थित मान्यवरांच्या प्रतिक्रिया...!



खूप लहान वयाचा मुली देखील तोंडावर दुपट्टा किंवा रूमाल बांधून वाईट मुलांच्या नादी लागल्या आहेत. मी माझ्या मुलीला सांगितले, आहे की कोणीही तुला त्रास दिला, तर त्याला तेथेच ठोक. अशी खमकी भुमिका सर्वांनी घेणे गरजेचे आहे.
**– ॲड. विवेक लाठी**



शिक्षणाशी संबंध नसलेले मुलेही सतत क्लासेसच्या अवती-भोवती फिरतात. त्यांच्या त्रासाला कंटाळुन एका मुलीने शिक्षण थांबविले आहे. पोलीसांनी ट्रिपल सिट व १८ वर्षाखालील बेछुट मोटारसायकलस्वारांवर कारवाई करावी. सार्वजनिक ठिकाणी तथा शहरातील मुख्य चौकांमध्ये ज्येष्ठांसाठी असलेल्या बाकांवर टवाळखोर मुले बसुन मुली व महिलांना त्रास देतात. त्यांच्यावर कायमस्वरूपी वचक राहील, अशी दहशतपूर्ण कारवाई गरजेची आहे.
**– श्री. विनोद जाधव, संचालक, जाधव क्लासेस,**



माझ्या १५०० मुली आहेत. मी रोजच छेडखानीच्या समस्येला तोंड देते. ग्रामीण भागातील विद्यार्थिनी बसमध्ये बसल्यानंतर टवाळखोर मुले त्यांची खिडकी ठोकतात. फुग्याने त्यांच्यावर पाणी उडवितात. अधुनमधुन जुजबी स्वरूपाच्या होणाऱ्या पोलीसी कारवायांना हे टवाळखोर घाबरत नाहीत. मी मुलींना मिरीचीची पूड सोबत ठेवणे, प्रसंगी थोबाडीत देणे, खमके राहणे शिकविते. अनेकदा शिक्षकांनाच मुलींना स्टॅण्डपर्यंत सोडण्यासाठी पाठवते.
**– सौ. सीमा सूर्यवंशी, मुख्याध्यापिका, डी. आर. कन्या शाळा.**



मुलींमध्ये टवाळखोरीची वादळे झेलण्याची क्षमता निर्माण करा. त्रिकोणी बगिच्याजवळ काही गुंड प्रवृत्तीची मुले मुलींची शाळा सुटण्याच्या वेळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित असतात. ते मुलींना त्रास देतात.
**– श्री. जे. के. चौधरी, नवीन मराठी शाळा.**



माझ्या पाठपुराव्यामुळे तीन टवाळखोरांच्या विरूद्ध पोक्सोचे गुन्हे दाखल झाले आहेत. अर्थात त्याचा मलाही खूप त्रास होतो. टवाळखोर मुलांकडे मुली आकर्षित होणार नाहीत, याची काळजी घेणे गरजेचे आहे. आम्ही अनेक गुंडांना ठोकले आहे.
**श्री. डी. एन. पालवे, शिक्षक, डी. आर. कन्या शाळा.**

जी. एस. हायस्कूल, श्री स्वामी समर्थ केंद्र परिसरात रात्री उशिरापर्यंत टवाळखोर मुले



परिसरातील रहिवाशांना विविध प्रकारचा त्रास देतात. त्यांना जाब विचारल्यास अंगावर धावून येतात. आपला मुलगा रात्री उशिरा घरी का येतो ? याबाबत पालकांनीच जाब विचारावा.
**– श्री. गजेंद्र साळुंखे, काँग्रेसचे नेते.**



जी. एस. हायस्कूलजवळ रात्री उशिरापर्यंत टवाळखोर मुलेच नाही, तर मुलीही असतात. तपास किंवा कारवाईबाबत पोलीसांकडून प्रतिसाद मिळाला नाही.
**– डॉ. बी. एस. पवार.**



आम्ही नेहमीच या समस्येला सामोरे जात आहोत. मी ज्या टवाळखोर मुलांना ठोकले आहे, हे ते नेहमी मला खुन्नस देतात. मात्र, माझ्यावर त्याचा काहीही परिणाम होत नाही. मी खंबीरच आहे.
**– श्री. दिलीप नारायण पाटील, शिक्षक**



छेडखानी फक्त विद्यार्थिनींचीच होते असे नव्हे. यात्रा , प्रवास व सार्वजनिक ठिकाणी महिलांचीही छेडखानी होते. अनेकांना गँगचा सदस्य होण्यात मोठेपण वाटते. अनेकांना मोठा नेता किंवा दादा होण्याची अभिलाषा आहे. या टवाळखोरांच्या गँगमध्ये सहभागी होण्यासाठी अनेक तरूण व अविचारी मुले सदैव तयार असतात. खासगी क्लासेसने को- एज्युकेशन बंद करावे. मुले व मुलींच्या एकत्रित सहली रद्द कराव्यात. त्यांच्या एकत्रित स्पर्धाही बंद कराव्यात. साने गुरुजी शाळेतील १० शिक्षक व शाळांचे कर्मचारी शाळा सुटल्यावर मुलींना संरक्षण देतात.
**– श्री. संदीप घोरपडे, सचिव, साने गुरुजी संस्था.**



हल्ली निवडणुका असल्यामुळे वृत्तपत्र क्षेत्रातील जवळपास सर्व जण जाहिरातींकरीता प्रयत्नशील आहेत. मात्र, दै. ग्लोबल महातेज अशाही धामधुमीत शहरातील ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी करीत असलेले प्रयत्न कौतुकास्पद आहेत. शिक्षकांच्या हातातील छडी गेली आणि संस्काराची घडी बिघडली आहे. पालकांकडे त्यांच्या पाल्यांबद्दल तक्रार केल्यास ते शिक्षकांनाच जबाबदार धरतात. अनेक पालकांना त्यांची मुले कोणत्या वर्गात व तुकडीत आहेत. त्यांचे शिक्षक कोण हेही माहित नसते. काही मुली शहरात आल्यावर भाड्याने मोबाईल घेतात.
**– आर. जे. पाटील, शिक्षक, जी. एस. हायस्कूल.**

नुकतीच एका ग्रामीण पालकाची माझ्याकडे त्यांच्या मुलीला छेडखानीमुळे होत असलेल्या त्रासाची माहिती दिली. मात्र, ते



वरपर्यंत तक्रारी द्यायला घाबरतात. सदर ज्वलंत समस्येबाबत संपूर्ण समाजाने लक्ष देणे गरजेचे आहे.
**– श्री. बी. के. सूर्यवंशी, काँग्रेसचे नेते.**



मुले नेहमी त्यांच्या पालकांना फॉलो करतात. अनेक पालकही फाजील लाडापायी त्यांच्या मुलांना गाड्या, महागडे मोबाईल वगैरे देतात. अनेक ठिकाणी पालकांचा त्यांच्या मुलांशी सुसंवादच नसतो. खरे तर मुला- मुलींच्या वर्तनातील बदल ओळखून पालकांनी त्यांच्याशी बोलले पाहिजे. पालकांचा त्यांच्या मुला- मुलींशी संवाद व प्रेमपूर्ण संबंध नसल्यानेच ही प्रेमाला पारखी झालेली मुले नको त्यांच्या प्रेमात पडतात. छेडखानीच्या समस्येच्या निराकरणासाठी विद्यार्थी, विद्यार्थिनी व पालकांनाही समुपदेशन गरजेचे आहे. त्यासाठी मी सहकार्य करेल.
**– डॉ. अविनाश जोशी, अध्यक्ष, म. वा. मंडळ.**



मुलींना संस्कारीत व समुपदेशीत करणे पालकांचीच जबाबदारी असते. अनेकांना दोनच अपत्य असल्याने जास्त लाड होतात. मुलींना संरक्षणासाठी कराटे, दांडपट्टा आदी शिकवावे.
**– सौ. रूपाली भामरे, शिक्षिका, एन. टी. मुंदडा स्कूल.**



मुली व महिलांनी आत्मसंरक्षणासाठी प्रशिक्षित होणे गरजेचे आहे. पुरूषी अहंकाराने वागणाऱ्या पालकांची मुले तसेच शिकून आईशी व बाहेरही तसेच वागतात. सर्वत्र व्यसनाधिनता वाढली आहे. यासाठी पोलीस प्रशासन जबाबदार आहे. गुटखा बंदी, दहशत गरजेची आहे. महिलांनी जागृत होणे गरजेचे आहे.
**– श्रीमती भारती गाला, सामाजिक कार्यकर्त्या.**



समानता घरापासूनच प्रारंभित व्हावी. टवाळखोर मुले नेहमी घोळक्याने येऊन दांडगाई करतात. आपणही हिंमत दाखविल्यास ते मागे हटतात. इज्जतीची समस्या अवास्तव व अवाजवीरित्या बळावल्याने अनेक समस्या दबल्या आहेत. पालकांनी मुला- मुलींची खुलून बोलणे गरजेचे आहे.
**श्री. उदय खैरनार, सामाजिक कार्यकर्ते.**



मुलींना खूप त्रास सोसावा लागतो आहे. हे पाहून आता आमचीही सहनशक्ती संपली आहे. यापुढे आमचा आता झिरो टॉलरन्स असेल.
**ॲड. भय्यासाहेब मगर, अध्यक्ष, खासगी क्लासेस संघटना**

### दिनविशेष
२८ नोव्हेंबर

- प्रभात चा माझा मुलगा हा चित्रपट रिलीज झाला.
- महान तेलगू कवी गुर्राम जोशुआ यांच्या नावाचा साहित्य पुरस्कार कवी नारायण सुर्वे यांना जाहीर झाला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# शहरातील अद्ययावत क्रीडा संकुल तरुणाईसाठी प्रेरणादायी

## श्री मंगळ ग्रह मंदिराचा होतोय कायापालट; पर्यटनाची आगळीवेगळी ओळख

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- शहरातील महिला, विद्यार्थी, युवा तसेच आबालवृद्धांच्या सर्वांगीण विकासासाठी अमळनेर तालुका व शहर विकास आघाडीच्या माध्यमातून विविध विकासकामांना डोळ्यासमोर ठेऊन माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील,खासदार स्मिताताई वाघ, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध विकासकामे सुरू आहेत. शहरात उभे राहत असलेले भव्य क्रीडा संकुल, जगभरात नावलौकिक असलेले श्री मंगळ ग्रह मंदिराचा होत असलेला कायापालट, झामी चौक भागात उभारण्यात येत असलेला जलकुंभ, छत्रपती शिवाजी महाराज उद्यानाचे सुशोभीकरण, तरुणांसाठी तयार तयार होत असलेल्या अभ्यासिका, पैलाड भागातील स्मशानभूमीचे नूतनीकरण यासह विविध विकासकामे प्रगतीपथावर आहेत.

**क्रीडा संकुलामुळे खेळाडूंच्या प्रगतीला चालना**

अमळनेर शहरातील मारवड रस्त्यावर १० कोटी रुपये निधीतून भव्य क्रीडा संकुल आकार घेत आहे. या क्रीडासंकुलाच्या माध्यमातून शहरातील हजारो तरुण विविध स्पर्धा परीक्षांच्या मैदानी चाचणीसाठी स्वतःला तंदुरुस्त ठेवत आहेत. हक्काचे मैदान मिळाल्यामुळे अनेक होतकरू तरुण पोलीस भरती तसेच इतर परीक्षांसाठी तयारी करताना दिसून येत आहेत. याच क्रीडासंकुलात बॅडमिंटन कोर्ट, माती तसेच गादीवरील कुस्तीची सुविधा, जॉगिंग ट्रॅक, टेबल टेनिस, ओपन जिम तसेच इतर सुविधा उपलब्ध आहेत. जिल्हा क्रीडा संकुलाच्या धर्तीवर अमळनेर तालुका क्रीडा संकुलात सुविधा पुरविण्यात येत आहेत. बंगाली फाईल, तांबेपुरा, पिंपळे रोड, गलवाडे रोड, मारवड रोड, ढेकू रोड तसेच शहरातील विविध भागातील तरूण याचा आपल्या चांगल्या भविष्यासाठी लाभ घेत आहेत. शहरातील श्री मंगळ ग्रह मंदिराची देशभरात एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे. आमदार अनिलदादा पाटील यांच्या निधीतून मंदिर परिसरातील विविध विकासकामांसाठी २५ कोटी रुपये निधी मिळाला आहे. त्यामुळे मंदिराचा कायापालट होत आहे. शहरातील झामी चौक भागात असलेला जीर्ण जलकुंभ पाडून त्याठिकाणी ३ कोटी रूपये निधीतून नवा जलकुंभ उभारला जात आहे. त्यामुळे माळी वाडा, कसाली मोहल्ला, अमलेश्वर नगर व त्या परिसरातील नागरिकांची पाण्याची समस्या कायमस्वरूपी मिटणार आहे. शहरातील पैलाड भागातील मुख्य स्मानशभूमीची दुरावस्था झाल्याने १ कोटी रूपये निधीतून त्या स्मशानभूमीचे नूतनीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे अंत्यसंस्कार सुरळीत होणार आहेत. पर्यावरणाचा समतोल साधला जावा यासाठी विद्युत दाहिनी देखील या ठिकाणी उभारली जाणार आहे. शहरातील विविध प्रभागांमध्ये स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत अभ्यासिका व ग्रंथालयांची उभारणी करण्यासाठी २ कोटी रूपयांचा निधी मिळाला आहे. काही प्रभागात कामे सुरू आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या सोयीसुविधा मिळणार आहे. शहराचा हाच विकास यापेक्षा दुपटीने होणार आहे. शहराच्या विकासासाठी अमळनेर तालुका शहर विकास आघाडीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार जितेंद्र ठाकूर तसेच १८ प्रभागातील ३५ उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन, अमळनेर तालुका शहर विकास आघाडीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.









# मसाला पान



# जर्सी गायीचे दूध : गैरसमज, वास्तव आणि काळजी

जर्सी गायीच्या दुधाबाबत वैज्ञानिक माहिती, वैद्यकीय निरीक्षणे आणि लोकपरंपरेतील मते यांचा संगम दिसतो. चला, याबाबत सविस्तर जाणून घेऊया...

**१) जर्सी गाय म्हणजे कोण ?**

**मूळ :** जर्सी गायी मूळतः जर्सी बेट (ब्रिटनजवळ) येथील आहेत.

**वैशिष्ट्य :** यांच्या दुधात चरबी आणि प्रथिने (प्रोटीन) जास्त असतात. परंतु काही लोकांना याचे विपरीत परिणाम दिसू शकतात.

**प्रथिन प्रकार :** भारतातील देशी गायींच्या (उदा.- गीर, साहीवाल) दुधात ए २ बीटा-कॅसिन प्रथिन असते, तर जर्सी आणि हायब्रीड गायींच्या दुधात प्रामुख्याने ए १ बीटा-कॅसिन असते.

**२) ए १ आणि ए २ दूध : फरक काय ?**

**ए २ दूध (देशी गायी) :**
पचनास सोपे, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणारे. गीर, साहीवाल, लाल सिंधी यांसारख्या गायींच्या दुधात आढळते.

**ए १ दूध (जर्सी, होल्स्टीन-फ्रिझियन):**
पचनादरम्यान बीटा-कॅसोमॉर्फिन-७ (बीसीएम-७) नावाचा पेप्टाइड तयार होऊ शकतो.
काही अभ्यासांनुसार यामुळे आतड्यांचे विकार, रोगप्रतिकारक शक्तीवर परिणाम आणि हृदयवाहिन्यासंबंधी जोखीम वाढू शकते.

**३) जर्सी दुधाचे संभाव्य परिणाम**

जास्त किंवा दीर्घकालीन सेवनामुळे खालील तक्रारी उद्भवू शकतात:

**४) सर्वांना त्रास होतो का ?**

नाही, जर्सी दुधाचा परिणाम व्यक्तीच्या पचनशक्ती, रोगप्रतिकारक शक्ती आणि आहारशैलीवर अवलंबून असतो.
काहींना जर्सी दूध सहज पचते, तर काहींना त्रास होऊ शकतो.

**५) आयुर्वेदिक दृष्टिकोन**

**देशी गायीचे दूध (ए२) :** सत्त्ववर्धक, ओजवर्धक, पचनास हलके.

**जर्सी/हायब्रीड दूध (ए१) :** कफवर्धक, जड, मंदपाक यामुळे अग्निमांद्य आणि कफजन्य विकार वाढू शकतात.

**उपाय :** जर्सी दूध घेतल्यास हळद, सुंठ, पिंपळी, दालचिनी यांसारख्या मसाल्यांसह सेवन करावे.

**६) काय करावे ?**

शक्यतो ए २ दूध (देशी गायी) निवडावे.

**जर्सी दूध वापरत असल्यास :**
गरम करून, मसाले घालून आणि प्रमाणात घ्यावे.
मुले आणि वृद्धांनी अतिसेवन टाळावे.
पचन तक्रारी, ॲलर्जी किंवा श्वसनाच्या समस्या असल्यास पर्याय शोधावेत.

**समज :** काही व्यक्तींना ए १ दूध पचविणे कठीण जाते. विशेषतः ज्यांची पचनशक्ती कमकुवत आहे त्यांना.

**ॲलर्जी / असहिष्णुता संभाव्य कारण:** दुधातील प्रथिनांवर (विशेषतः ए १ बीटा-कॅसिन) शरीराची प्रतिकूल प्रतिक्रिया.

**निरीक्षण :** यामुळे त्वचेवर पुरळ, खाज येणे किंवा श्वसनासंबंधी तक्रारी (उदा.- श्वास घेण्यास त्रास) होऊ शकतात.

**समज :** काही लोकांमध्ये दूध प्रथिनांबाबत संवेदनशीलता असते. ज्यामुळे ॲलर्जी किंवा असहिष्णुतेची लक्षणे दिसतात.

**श्वसन समस्या**

**संभाव्य कारण :** जर्सी दुधामुळे कफ वाढणे.

**निरीक्षण :** यामुळे दमा (अस्थमा) किंवा सायनसायटिस यांसारख्या श्वसनासंबंधी समस्यांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे.

**समज:** आयुर्वेदानुसार, जर्सी दूध कफवर्धक आहे, ज्यामुळे श्वसनमार्गात कफ जमा होऊ शकतो.

**हृदयविकार जोखीम**

**संभाव्य कारण :** बीसीएम-७ चा दीर्घकालीन परिणाम.

**निरीक्षण :** काही अभ्यासांनुसार, ए १ दुधाचे नियमित सेवन कोलेस्टेरॉल असंतुलनास कारणीभूत ठरू शकते, ज्यामुळे हृदयविकाराची जोखीम वाढू शकते.

**समज :** याबाबत वैज्ञानिक संशोधन मर्यादित आहे, परंतु दीर्घकालीन सेवनामुळे हृदयवाहिन्यासंबंधी समस्या उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**मधुमेह (प्रकार १) जोखीम**

**संभाव्य कारण :** ए १ प्रथिनामुळे रोगप्रतिकारक यंत्रणेत गडबड.

**निरीक्षण :** काही अभ्यासांमध्ये मुलांमध्ये प्रकार १ मधुमेहाची जोखीम वाढल्याची नोंद आहे. कारण ए १ प्रथिन रोगप्रतिकारक यंत्रणेच्या चुकीच्या प्रतिसादाला चालना देऊ शकते.

**समज :** ही जोखीम सर्वांनाच लागू होत नाही. याबाबत अधिक संशोधन आवश्यक आहे.

**लठ्ठपणा**

**संभाव्य कारण :** जर्सी दुधातील उच्च चरबी आणि ऊर्जा घनता.

**निरीक्षण :** नियमित आणि जास्त प्रमाणात सेवन केल्यास वजन वाढण्याची शक्यता आहे.

**समज :** जर्सी दुधात चरबीचे प्रमाण जास्त असल्याने विशेषतः कमी शारीरिक हालचाली असणाऱ्या व्यक्तींमध्ये लठ्ठपणाची जोखीम वाढू शकते.



## ' हा ' देश मानतो कावळ्याला आपला राष्ट्रीय पक्षी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कावळा कोणत्या देशाचा राष्ट्रीय पक्षी आहे जाणून घ्या.

**भूतान**

कावळा हा भूतान या देशाचा अधिकृत राष्ट्रीय पक्षी आहे.

**धार्मिक महत्त्व**

भूतानमध्ये रावेनला हिंदू-बौद्ध धर्मानुसार महाकाल या संरक्षकाचे प्रतीक मानले जाते.

**फिन**

भूतानमध्ये याला फिन असे ही म्हणतात

**प्रतीक**

हा एक पविकत्र पक्षी मानला जातो. तसेच हा भूतानच्या राजेशाही मुकुटाचे प्रतीक आहे.

**राजकीय निर्णय**

कावळ्याला राष्ट्रीय प्रतीक म्हणून स्वीकारणे हा भूतानच्या पारंपरिक श्रद्धा आणि आधुनिक राष्ट्रवादाचा समन्वय आहे.

**सरकारी संरक्षण**

भूतान सरकारने कावळ्याच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी विशेष नियम बनवले आहेत.

**दुर्मिळता**

कावळा (रावेन) हा आशियातील इतर देशांपेक्षा भूतानमध्ये अधिक प्रमाणात आणि आदराने जपलेला आहे.

**पर्यटन**

भूतानच्या सांस्कृतिक वारसा आणि नैसर्गिक वैभवाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांना या पक्ष्याच्या महत्त्वाचा उल्लेख आवर्जून केला जातो.

# नवी मुंबई विमानतळासमोर समस्यांचा डोंगर ?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे ८ ऑक्टोबर २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या विमानतळाबाबत गेल्या काही वर्षांपासून सर्वांना उत्सुकता होती. हे विमानतळ प्रवाशांसाठी किती सोयीचे ठरेल याबाबत चर्चा सुरू होती. मात्र, जाणकारांच्या मते- या विमानतळावर पोहोचणे सध्या आव्हानात्मक आहे. तसेच पुढील काळातही काही अडचणी कायम राहण्याची शक्यता आहे.



**सध्याच्या आव्हानांची यादी**

**१) अंतर आणि वाहतूक कोंडी**

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबईच्या मुख्य भागापासून सुमारे ३५-४० कि.मी. अंतरावर आहे.
- प्रवाशांना सायन-पनवेल महामार्ग, पाम बीच रोड किंवा बेलापूर मार्गाचा वापर करावा लागतो. हे रस्ते, विशेषतः सकाळी आणि सायंकाळी ऑफिसच्या वेळेत, वाहतूक कोंडीमुळे भरलेले असतात.
- बेलापूरमार्गे विमानतळावर पोहोचण्यास काही तास लागू शकतात. विशेषतः टॅक्सी किंवा स्वतःच्या वाहनाने प्रवास करताना.

**२) सार्वजनिक वाहतूक सुविधांचा अभाव**

- सध्या विमानतळापर्यंत लास्ट-माइल कनेक्टिव्हिटीची कमतरता आहे. मेट्रो लाइन अद्याप कार्यान्वित झालेली नाही. ती भविष्यात सुरू होईल.
- बस सेवा उपलब्ध असली, तरी त्या वाहतूक कोंडीत अडकतात. त्यामुळे वेळेवर पोहोचणे कठीण आहे.

**३) प्रादेशिक कनेक्टिव्हिटी**

- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक ब्रिजमुळे दक्षिण मुंबई (वडाळा, सीवूड्स) ते नवी मुंबई असा प्रवास काहीसा सोपा झाला आहे. मात्र, पश्चिम उपनगरांमधून (अंधेरी, बांद्रा, गोरेगाव, विक्रोळी, मुलुंड) येणाऱ्या प्रवाशांसाठी हा प्रवास अजूनही वेळखाऊ आहे.

**४) एअर ट्रॅफिक मॅनेजमेंट**

- मुंबई आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळांवरून एकाच वेळी उड्डाणे सुरू असतील, तेव्हा मार्ग आणि वेळेचा समन्वय साधणे आव्हानात्मक असेल.
- तांत्रिक समन्वय योग्य न झाल्यास उड्डाणांना विलंब किंवा फ्लाइट होल्डिंग वाढण्याची शक्यता आहे.

**सुधारणेसाठी उपाय आणि भविष्यातील शक्यता**

- **मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि मेट्रो जोडणी :** मुंबई ट्रान्स हार्बर लिंकने काही प्रमाणात सुधारणा झाली असली, तरी मेट्रो लाइन पूर्ण झाल्यावर विमानतळापर्यंतचा प्रवास अधिक सुलभ होईल.
- **वाहतूक नियोजन :** वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी रस्ते सुधारणा आणि पर्यायी मार्गांचा विकास आवश्यक आहे.
- **सार्वजनिक वाहतूक सुधारणा :** लास्ट-माइल कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी विशेष बस सेवा, शटल सेवा किंवा मेट्रो स्टेशनपर्यंत जलद वाहतूक सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे.
- **एअर ट्रॅफिक नियंत्रण :** दोन्ही विमानतळांमधील उड्डाणांचा समन्वय साधण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि काटेकोर नियोजन आवश्यक आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आधुनिक सुविधांनी युक्त आहे. परंतु सध्या वाहतूक कोंडी, अंतर आणि सार्वजनिक वाहतुकीच्या कमतरतेमुळे प्रवाशांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. मुंबई ट्रान्स हार्बर लिंक आणि भविष्यातील मेट्रो जोडणीमुळे परिस्थिती सुधारेल. परंतु सध्यातरी विमानतळावर पोहोचणे हे वेळ, अंतर आणि वाहतुकीच्या कोंडीची कसोटी पाहणारे आहे. या आव्हानांवर तातडीने उपाययोजना केल्यासच हे विमानतळ खऱ्या अर्थाने सोयीचे ठरेल.



## ॥ मंगल पान ॥

# पंचमुखी हनुमान की पौराणिक कथा।

जब राम और रावण की सेना के मध्य भयंकर युद्ध चल रहा था, और रावण अपने पराजय के समीप था, तब इस समस्या से उबरने के लिए उसने अपने मायावी भाई अहिरावन को याद किया, जो मां भवानी का परम भक्त होने के साथ साथ तंत्र मंत्रका बड़ा ज्ञाता था। उसने अपने माया के दम पर भगवान राम की सारी सेना को निद्रा में डाल दिया । तथा राम एवं लक्ष्मण का अपरहण कर उनको पाताल लोक ले गया।

कुछ घंटे बाद जब माया का प्रभाव कम हुआ, तब विभिषण ने यह पहचान लिया कि, यह कार्य अहिरावन का है, और उसने हनुमानजी को श्री राम और लक्ष्मण सहायता करने के लिए पाताल लोक जाने को कहा। पाताल लोक के द्वार पर उन्हें उनका पुत्र मकरध्वज मिला, और युद्ध में उसे हराने के बाद बंधक श्री राम और लक्ष्मण से मिले। वहां पांच दीपक उन्हें पांच जगह पर पांच दिशाओं में मिले, जिसे अहिरावण ने मां भवानी के लिए जलाए थे। इन पांचों दीपक को एक साथ बुझाने पर अहिरावन का वध हो जाएगा, इसी कारण हनुमान जी ने पंचमुखी रूप धरा।

उत्तर दिशा में वराह मुख, दक्षिण दिशा में नरसिंह मुख, पश्चिम में गरुड़ मुख, आकाश की तरफ हयग्रीव मुख एवं पूर्व दिशा में हनुमान मुख। इस रूप को धरकर उन्होंने वे पांचों दीप बुझाए तथा अहिरावण का वध कर राम, लक्ष्मण को उस से मुक्त किया।

# भगवंताच्या उपासनेत हवी उत्कट भावना!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

विस्तव माहीत नसला तरी तो हाताला चुकूनही लागला तरी हात भाजतो. त्याचप्रमाणे परीस आहे हे माहीत नसूनही लोखंडाचा घण त्यावर मारला तरी त्याचे सोने व्हायचे राहत नाही. त्यानुसार ज्ञानाशिवाय नुसते भक्तीने जरी भगवंताकडे गेले तरी काम होते. परंतु दुसऱ्या विषयांची आसक्ती जोवर आपल्याला सुटत नाही तोवर मनापासूनची भगवद्‌भक्ती होत नाही. जेथे उत्कट भावना आहे तेथे सगुण मूर्तीला मनुष्यधर्म प्राप्त होतील. उपासक देहाला विसरला की उपास्यमूर्तीमध्ये त्याला जीवंतपणा अनुभवाला येऊ लागेल. शिवाय जे इतर लोक थोडे तन्मय झाले आहेत त्यांनाही ते अनुभवाला येईल. परंतु उपासकाची किंवा भक्ताची भावना नेहमी तितकी उत्कट राहीलच, असा नेम नाही. त्यामुळे अशा उपासकाला मूर्तीमधील चैतन्याचा अनुभव येऊनही पारमार्थिकदृष्ट्या फायदा होईलच, असे निश्चित नाही.

एका मुलाने काहीतरी खोडी केली. त्यामुळे शेजारच्या बाईने त्याला चापट मारली. त्याबरोबर त्या मुलाने मोठे भोकाड पसरले. त्या बाईला शिव्या दिल्या. ते ऐकून त्याची आई बाहेर आली. तिने त्याला चांगलेच झोडपले. परंतु आईच्या हातचा इतका मार खाऊनही तो मुलगा फार ओरडला नाही. त्याने आईला उलट शिव्याही दिल्या नाहीत. हे जसे खरे, त्याप्रमाणे आपल्यावर येणारी संकटे ही भगवंताने आणली आहेत अशी निष्ठा असेल, तर आपल्याला त्यांचा त्रास होईल. मात्र त्याने आपली शांती बिघडणार नाही. भगवंताचा विसर पडला की आपली शांती बिघडते. ज्या दातांनी सिंह मोठमोठे प्राणी मारतो त्याच दातांनी तो आपल्या पिलांना इजा न करता उचलतो, हे लक्षात असू द्यावे. आपण निःपक्षपाती बुद्धीने विचार केला तर भगवंताचा मार्ग आपल्याला सापडेल. भगवंत हा सर्वांना साध्य आहे, फक्त काही न करणाऱ्याला तो साध्य नाही. आपल्याला जेवढे समजले आहे तेवढे आपण आधी करावे. मग पुढील माहिती आपोआप मिळते. त्यामध्ये समाधान असावे, उगीच जास्त चिकित्सा करणे हे मीपणाचे आणि देहबुद्धीचे लक्षण आहे. ज्याला भगवंताचे सान्निध्य लाभले त्यालाच निर्भयता आणि निर्वासनता येईल. प्रत्येक माणसाला आधार लागतो, पण आपण अपूर्णाचा आधार धरल्यामुळे आपल्याला निर्भयता येत नाही. यासाठी भगवंताचा आधार धरावा. बुद्धीने निश्चय करावा आणि मन भगवंताकडे लावावे, की इंद्रिये तिकडे बळजबरीने जातीलच. प्रभू श्रीराम उपाधीरहित आणि त्यांचे नामही उपाधीरहित आहे. त्यामुळे ज्याप्रमाणे खडक किंवा वाळू पाण्याशी मिसळत नाहीत, साखर किंवा मीठच विरघळते आणि समरस होते, तद्वत प्रभू श्रीरामांशी त्यांचे नामच समरस होते.



## देवाकडे पाठ करून का बसू नये, याचे कारण काय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मंदिरात दर्शन घेतल्यानंतर आपण देवासमोर काही क्षण बसतो, नामस्मरण करतो. मंदिरात आपल्याला नेहमी सांगितले जाते, की देवाकडे पाठ करून बसू नये. यामागे नेमके कारण काय आहे ?

देवाकडे पाहून आपण त्याचे जेव्हा नामस्मरण करतो तेव्हा त्याचा आपल्यावर चांगला प्रभाव पडत असतो. धार्मिक कारणांनुसार भगवंताकडे पाठ करून बसणे हा देवाचा अनादर केल्याप्रमाणे आहे. त्यामुळे देवाकडे पाठ करणे म्हणजे पावनतेकडे, त्याच्या आशीर्वादाकडे पाठ फिरविल्यासारखे असते. हे अशुभ मानले जाते.

ईश्वर सर्वत्र असला, तरी मंदिरात त्याची जी प्रतिमा असते तिच्यासमोर बसल्यास अधिक सकारात्मक ऊर्जा आपल्याला मिळते. या प्रतिकाकडे पाठ करून बसणे देवाला अव्हेरल्याप्रमाणे असल्याचे पुराणात लिहिले आहे. मात्र नास्तिक पंथाचे लोक आपला देवावर विश्वास नाही, हे दर्शविण्यासाठी मंदिरात प्रवेश करूनही देवाकडे पाठ करतात. त्यामुळे आपण नास्तिक नसल्याचे दर्शविण्यासाठी देवाच्या नजरेसमोर बसण्याची पद्धत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# अभिनेते धर्मेंद्र यांनी शेतीच्या आवडीतून जळगावच्या जैन इरिगेशनला दिली होती भेट...!

## जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांनी दिला आठवणींना उजाळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेते धर्मेंद्र यांचा पुणे जिल्ह्यात मावळ तालुक्यात लोणावळ्याजवळ औंढे गावात शंभर एकरावर मोठा फार्म हाऊस आहे. त्यांना शेतीची प्रचंड आवड होती. त्यामुळे त्यांनी जळगावमधील जैन इरिगेशनलाही एकदा भेट देऊन नवीन तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली होती. जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोकभाऊ जैन यांनी त्यांच्या भेटीप्रसंगीच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

अभिनेते धर्मेंद्र यांनी औंढे गावातील शंभर एकर शेतजमिनीचा व्यवहार १२ जून १९८५ ला केला होता. त्यानंतर त्यांनी सुमारे ६५ एकर शेतीत विविध प्रकारची फळे, कोबी, टोमॅटो, वांगी यासारख्या भाजीपाला पिकांची लागवड केली होती. शेतीतून मिळणारे उत्पन्न ते शेतात काम करणाऱ्या मजुरांना वाटून देत होते.

कोंबड्या, बदके, म्हशी, जर्सी गायी देखील त्यांनी सांभाळल्या होत्या. शेती करतानाही त्यांचा सेंद्रिय निविष्ठा वापरण्याकडे विशेष कल होता. शेतीच्या आवडीतून त्यांनी बरीच वर्षे औंढे गावातील फार्म हाऊसवर वास्तव्य केले होते. जळगावात केळीसह डाळिंब, स्ट्रॉबेरी, पेरू, मोसंबीवर सुरू असलेल्या संशोधनाची माहिती मिळाल्यानंतर अभिनेते धर्मेंद्र यांनी ८ मे २०१६ रोजी जैन इरिगेशनला भेट दिली होती. धर्मेंद्र यांच्यासमवेत



त्यावेळी बॉबी देओल, राज्याचे तत्कालीन कृषी व महसूलमंत्री एकनाथराव खडसे, खासदार रक्षा खडसे आदी उपस्थित होते. जळगावात आल्यानंतर जैन इरिगेशन मार्फत राबवल्या जाणाऱ्या शेतीसंदर्भातील आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेतल्यानंतर हे तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांनी जैन हिल्सवरील बायोटेक लॅब, अति घनदाट पद्धतीने केलेली आंबा, पेरू आणि मोसंबीची लागवडीची पद्धत, लाखो शेतकरी वापरत असलेली अत्याधुनिक सूक्ष्मसिंचन प्रणालीची पाहणी केली होती. जैन टिश्यूकल्चर केळी रोपांपासून शेतकऱ्यांचा होणारा फायदा आणि अलीकडील काही वर्षांत या रोपांची शेतकऱ्यांकडून वाढलेल्या मागणीबद्दल त्यांनी आश्चर्य व्यक्त केले होते. मी स्वतः एक शेतकरी असून पंजाबसह महाराष्ट्रात आपली शेती असल्याचे त्यावेळी त्यांनी सांगितले होते. जैव तंत्रज्ञानाच्या माध्यनातून तयार करण्यात आलेली केळी, डाळिंब, स्ट्रॉबेरी, पेरू, मोसंबीची रोगमुक्त रोपे पाहून आपण भारावलो आहोत. या रोपांची लागवड करून त्यांची फळे चाखायला मला आणि माझ्या कुटुंबियांना नक्कीच आवडेल, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया देखील त्यांनी दिली होती. यादरम्यान, अभिनेते धर्मेंद्र यांनी जैन व्हॅलीतील सोलर वीजनिर्मिती प्रकल्प तसेच सोलर युनिटला भेट देऊन सौर कृषिपंपाबद्दल सविस्तर माहिती जाणून घेतली होती. गांधीतीर्थ येथेही सदिच्छा भेट देऊन त्यांनी गांधी रिसर्च फाउंडेशनच्या विविध उपक्रमांची पाहणी केली होती.

# महसूल मंत्री ना. बावनकुळेंचा वाळू माफियांवर 'सर्जिकल स्ट्राइक'

## अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परवाने जागेवरच होणार रद्द

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात वाळू व इतर गौण खनिजांचे अवैध उत्खनन आणि वाहतूक सर्रास सुरू आहे. हे रोखण्यासाठी महसूलमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकानुसार अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनांचे परवाने (परमिट) जागेवरच रद्द होणार आहेत. या कठोर कारवाईने वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या वाळू आणि इतर गौण खनिजांची लयलूट होतआहे.



शासनाच्या कोट्यवधी रूपयांचा महसुलही बुडत आहे. पर्यावरणाचीही मोठी हानी होत आहे. अवैध व्यवसायातून गुन्हेगारीसुद्धा वाढती आहे. कारवाईसाठी जाणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आता महसूल विभागाकडून ही कठोर कारवाई होणार आहे.

शासनाचा महसूल चुकविणे हा गंभीर गुन्हा आहे. अनेक जण जाणीवपूर्वक हा गुन्हा करतात. त्यांना वचक बसविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे महसूलमंत्री ना. बावनकुळे यांनी सांगितले.

### तीन टप्प्यात शिक्षा....

- पहिला गुन्हा असेल तर ३० दिवसांसाठी परवाना निलंबित.
- दुसरा गुन्हा असेल तर ६० दिवसांसाठी परवाना निलंबीत.
- तिसरा गुन्हा असेल तर संबंधित वाहनाचा परवाना कायमस्वरूपी रद्द करणे आणि वाजन जप्त करणे.

### या वाहनांवर होणार कारवाई

अवैध उत्खनन आणि वाहतुकीसाठी वापरले जाणारे ड्रील मशिन, जेसीबी व पोकलँड, ट्रॅक्टर, ट्रॉली, ट्रक, डंपर, ट्रॉलर, कॉम्प्रेसर, मोटोराईज्ड बोट, एक्सकॅव्हेटर, मॅकेनाईज्ड लोडर आदी वाहनांवर व साहित्यावर कारवाई लागू असणार आहे.

# डिसेंबरमध्ये बँका किती दिवस बंद राहणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : नोव्हेंबर महिना संपत आला आहे आणि या वर्षाचा शेवटचा महिना डिसेंबर सुरू होणार आहे. जर तुम्ही पुढच्या महिन्यात बँकेला भेट देण्याचा विचार करत असाल, तर तुमच्या भेटीचे नियोजन करण्यापूर्वी तुमच्या शहरातील बँकांच्या सुट्ट्या नक्की तपासा. डिसेंबरमध्ये वेगवेगळ्या शहरांमध्ये विविध कारणांमुळे बँका एकूण १८ दिवस बंद राहतील. त्यामुळे बँकेला भेट देण्यापूर्वी बँकांच्या सुट्ट्यांबद्दल जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

डिसेंबरमधील बँकांच्या सुट्ट्या डिसेंबरमध्ये एकूण १२ दिवस बँका बंद राहतील. यामध्ये रविवार, शनिवार आणि काही सणांच्या सुट्ट्यांचा समावेश आहे. या सुट्ट्या खालीलप्रमाणे आहेत. १ डिसेंबर रोजी अरुणाचल प्रदेशात स्वदेशी श्रद्धा दिनानिमित्त बँका बंद राहतील. ३ डिसेंबर रोजी गोव्यात सेंट फ्रान्सिस झेवियर्स डेनिमित्त बँका बंद राहतील. १२ डिसेंबर रोजी पा तोगन नेंगमिंजा संगमा दिनानिमित्त मेघालयात बँका बंद राहतील. १८ डिसेंबर रोजी गुरू घासीदास जयंतीनिमित्त आणि मेघालयात यू सोसो थाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त बँका बंद राहतील. १९ डिसेंबर रोजी मुक्ती दिनानिमित्त गोव्यात बँका बंद राहतील. २४ डिसेंबर रोजी नाताळाच्या एक दिवसपूर्वी मेघालय आणि मिझोरममध्ये बँका बंद राहतील. २५ डिसेंबर रोजी नाताळाच्या निमित्ताने देशातील बहुतेक राज्यांमध्ये बँका बंद राहतील. २६ डिसेंबर रोजी नाताळाच्या उत्सवामुळे मेघालय, मिझोरम आणि तेलंगणामध्ये बँका बंद राहतील. २७ डिसेंबर रोजी शहीद उधम सिंह जयंतीनिमित्त हरियाणामध्येही बँका बंद राहतील. २७ डिसेंबर रोजी गुरू गोविंद सिंह जयंतीनिमित्त हरियाणा, पंजाब आणि हिमाचल प्रदेशात बँका बंद राहतील. ३० डिसेंबर रोजी यू क्यांग नांगबाह दिनानिमित्त आणि सिक्कीममध्ये तमु लोसारनिमित्त बँका बंद राहतील. ३१ डिसेंबर रोजी मिझोरम आणि मणिपूरमध्ये नवीन वर्षाच्या दिवशी बँका बंद राहतील.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# संविधानाची मूल्ये भारताच्या प्रगतीची पायाभरणी करणारे!

## ॲड. सारांश सोनार; बोहरा इंग्लिश स्कूलमध्ये संविधानदिन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– भारतीय संविधान हा आपल्या देशाचा आत्मा आहे. समता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुता ही मूल्ये भारताच्या प्रगतीची पायाभरणी करतात, असे प्रतिपादन ॲड. सारांश धनंजय सोनार यांनी केले.



येथील सायरादेवी बोहरा इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिनानिमित्त बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या कार्यक्रमप्रसंगी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. प्राचार्य श्री. जितेंद्र सिंह अध्यक्षस्थानी होते. सौ. भारती संदानशिव प्रमुख पाहुण्या होत्या.

ॲड. सोनार पुढे म्हणाले, की संविधानाचे तत्त्वज्ञान आणि त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांनी समजून घेणे आवश्यक आहे. संविधानानुसार मूलभूत कर्तव्यांचे पालन करावे. सामाजिक व धार्मिक भेदभाव दूर ठेवावा. सर्वांशी प्रेमाने व आदराने वागावे. प्राचार्य श्री. सिंह यांनी संविधानदिनाचे शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय महत्त्व स्पष्ट केले. सौ. भारती संदानशिव यांनीही मनोगत व्यक्त केले. दरम्यान, कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी संविधान जनजागृतीवरी नाटिका सादर केली. तसेच देशभक्तीपर गीतांचेही सादरीकरण करण्यात आले. रश्मी जैन व नेहा गुरव यांनी सूत्रसंचालन केले.

# नंदिनी पाटील करणार क्रिडा महोत्सवाचे प्रतिनिधित्व!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– तालुक्यातील वाघोदे येथील नंदिनी मुकेश पाटील हिची क्रिडा महोत्सव २०२५ साठी निवड झाली आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे ती प्रतिनिधीत्व करणार आहे. नंदिनी ही प्रताप महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे.



उत्कृष्ट कामगिरीतून तिने खो–खो (महिला विभाग) या क्रीडा प्रकारात आपले स्थान पक्के केले आहे. यंदाचा महाराष्ट्र आंतरविद्यापीठ क्रिडा महोत्सव २०२५ नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ यांच्यातर्फे ४ ते ८ डिसेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. दिनेश पाटील, प्रताप महाविद्यालयाचे क्रीडा संचालक सचिन पाटील, अमृत अग्रवाल, लोंढवे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब पाटील, क्रीडा शिक्षक मिलिंद पाटील यांनी नंदिनीचे अभिनंदन केले आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनीला नेतृत्वाची संधी मिळाली आहे. याबद्दल तीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# संविधानिक मूल्ये चिरकाल टिकणारे

## डॉ. ललित मोमाया; प्रताप महाविद्यालयात संविधानदिन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– भारतीय संविधान नसते तर अराजकता माजली असती. संविधानिक मूल्य हे समाजपयोगी आहे. संविधान हे एकता व अखंडतेच्या दृष्टीने चिरकाल टिकणारे आहे, असे प्रतिपादन डॉ. एल. एल. मोमाया यांनी केले.



येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयांतर्गत राज्यशास्त्र विभाग, करिअर कौन्सिलिंग सेंटर व राष्ट्रीय सेवा योजना विभागद्वारे बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी अकराला सीसीएमसी हॉलमध्ये झालेल्या संविधान दिनाच्या कार्यक्रमप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव अध्यक्षस्थानी होते. डॉ. जे. बी. पटवर्धन, डॉ. एस. वाय. सोनवणे, डॉ. एच. डी. जाधव आदी व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. मोमाया पुढे म्हणाले, की संविधानाचे मूल्ये विद्यार्थ्यांनी समजून घ्यावे. संविधानाचे सर्वांनी वाचन करावे. संविधानामुळेच आपण सुरक्षित आहोत. संविधानाने प्रत्येक नागरिकाला हक्क दिले आहेत. म्हणून आपल्या हक्काची, जबाबदारीची व कर्तव्याची जाणीव ठेवावी. प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव यांनी यांनी संविधानाचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रारंभी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व २६/११ रोजी शहीद झालेल्या जवानांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते उद्देशपत्रिका व संविधान ग्रंथाचेही पूजन झाले. डॉ. सुनील राजपूत यांनी संविधानाचे सामुहिक वाचन करवून घेतले.

सिनेट सदस्य डॉ. धिरज वैष्णव, डॉ. अमित पाटील, डॉ. नीलेश चित्ते, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. धनंजय चौधरी, डॉ. तुषार रजाळे, डॉ. अशोक पाटील, डॉ. ज्ञानेश्वर मराठे, डॉ. रमेश माने, डॉ. किरण सूर्यवंशी, डॉ. अनिल झळके, डॉ. रामदास सुरळकर, क्रीडा संचालक डॉ. सचिन पाटील, डॉ. विलास गावित, डॉ. रवी बाळसकर, डॉ. रवींद्र मराठे, डॉ. हर्ष नेतकर, प्रा. दिलीप तडवी आदी उपस्थित होते. करिअर कौंसेलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे यांनी सूत्रसंचालन केले.

डॉ. राखी घरटे, प्रा. हिमांशू गोसावी, प्रा. अमोल अहिरे, पराग पाटील, अतुल धनगर, विशाल अहिरे, नंदू पाटील, धिरज चौधरी, दितेश चिंचोरे, गिरीश पाटील, विशाल पाटील, योगेश चिंचोरे, सुमित चौधरी, गोपाळ पाटील आदींनी सहकार्य केले.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

## वसा संघर्षाचा....वारसा विजयाचा...!




# रडायचं नाही लढायचं !

विद्यार्थी चळवळीत देखील आपण संघर्ष प्रमुख होता....

जीवनाच्या वाटचालीत देखील अनेक संकटांवर आपण मात केली....

अन्यायाविरोधातील आपला प्रतिकार आजही
अनेकांच्या स्मरणात आहे....

संघर्षातून विजय

ही आपली शिकवण आम्हाला आजही प्रेरणादायी आहे....

आपल्या ६ व्या पवित्र स्मृतीदिनी भावपूर्ण श्रद्धांजली..!

**श्रीमती स्मिता उदय वाघ**
खासदार, जळगाव लोकसभा

समस्त वाघ परिवार, पलांडे परिवार आणि माने परिवार

**सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी, भारतीय जनता पार्टी, जळगाव जिल्हा**